# परिशिष्ट - ७ ब

## जिल्हाधिकारी यांजकडुन

## गेवराई नगर परिषद, जिल्हा बीड

क्र. २०१६/जि.बी./डेस्क-१/एमयुएन/०११ दिनांक : ११.०८.२०१६

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/न.प. २०१६/प्र.क्र.१०/का-६ दिनांक १५ जुन २०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) चे कलम १०(१) खाली बीड जिल्हयाचा जिल्हाधिकारी निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचिमध्ये दर्शविलेल्या प्रमाणे **गेवराई नगर परिषद** क्षेत्र जितक्या प्रभागामध्ये विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चीत करण्याचे आणि ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याच प्रमाणे स्त्रीयांसाठी (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गातील स्त्रीयांसाठी) जागा राखुन ठेवण्यात येतील ते प्रभाग दर्शविणारा क्रमांक २०१६/जी.बी./डेस्क-१/एमयुएन/**००५** दि. ०५.०७.२०१६ च्या आदेशाचा प्रारुप मसुदा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) च्या कलम १० (१) च्या परंतुकामध्ये निश्चित केलेल्या पध्दतीप्रमाो उक्त नगर परिषद क्षेत्रातील रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत आला होता. त्यास अनुसरुन आलेल्या हरकतींचा सर्वकष विचार करुन त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या हरकतीवर सुनावणी घेऊन मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अभिप्राय सादर करुन मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी पत्र क्र. २०१६ न.पा.प्र. निवडणूक कावी / **१३७** दि. २९.०७.२०१६ अन्वये मान्यता दिल्यानुसार मी,नवल किशोर राम बीड जिल्हयाचा जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम १० पोटकलम (१) अन्वये प्रदान कलेल्या अधिकाराचा वापर करुन निम्नोक्त आदेश देत आहे.

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) च्या कलम ९ पोटकलम (२) अन्वये मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश क्र. २०१६/न.प.प्र./आस्था-२/कावि दि. १४.०५.२०१६ अन्वये त्यांनी **गेवराई** नगर परिषदेच्या बाबतीत खाली दर्शविल्या प्रमाणे निवडावयाच्या सभासदांची संख्या अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्ग यांच्यासाठी राखुन ठेवावयाच्या जागा व स्त्रीयांसाठी (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रीयांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) निश्चित केलेल्या आहेत.

(१) निवडावयाची सभासदांची संख्या :- १९

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्ग यासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या

- (अ) अनुसूचित जाती :- ०२
- (ब) अनुसूचित जमाती :- ००
- (क) नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्ग :- ०५

(३) महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) :- १०

(४) उपरोक्त क्रमांक ३ पैकी वरील क्रमांक २ (अ), (ब) व (क) येथील जागांमध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखुन ठेवावयाच्या जागांची संख्या खालील प्रमाणे राहिल

- (अ) अनुसूचित जाती :- ०१
- (ब) अनुसूचित जमाती :- ००
- (क) नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्ग :- ०३

(५) महिलांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून ठेवावयाच्या जागांची संख्या :- ०६
(अनुक्रमांक ३ समोरील नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक ४ अ, ब, व क समोरील नमुद केलेल्या जागा)

(६) सर्वसाधारण (अनारक्षीत) जागांची संख्या :- ०६
(अनुक्रमांक १ समोर नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक २ अ, २ ब, २ क व अनुक्रमांक ५ समोरील नमुद केलेल्या जागा)

२. त्या अर्थी, आता मा.अवर सचिव राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/नपा-२०१६/प्रक्र.१०/का-६ दि. १५ जुन २०१६ नुसार व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०, पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, बीड याद्वारे **गेवराई नगर परिषद** क्षेत्र जितक्या भागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती व जनगणना २०११ नुसार प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या आणि त्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या या आदेशाच्या अनुसूचि मध्ये दर्शविल्या प्रमाणे निश्चित करीत असुन ज्या प्रभागामध्ये यथास्थिती (अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी व महिलांसह) जागा राखुन ठेवण्यात येतील हे प्रभाग निर्दिष्ट करीत आहे.

(७) या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अंमलात येईल.

स्थळ :- बीड
दि. ११ /०८/२०१६

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी, बीड

अनुसूची

गेवराई नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०१६

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ४ | ६ |
| १ | संजयनगर, शिवाजीनगर | एकूण - ३६५३<br>अ.जा. - ५८८<br>अ.ज.-११८ | १-अ<br>१- ब | उत्तर - शिवाजी नगरचा भाग व न.प. हद्द<br>पुर्व - कोल्हेररोड (शिवाजी चौक ते काळे चे घर ते शिवाजी नगर)<br>दक्षिण - एन.एच.२११ (शिवाजी चौक ते लोकमान्य हॉस्पीटल)<br>पश्चिम - एन.एच.२११ जमादारणीच्या पुला पर्यंत | १अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>१ब- सर्वसाधारण महिला |
| २ | शाहुनगर, भगवानगर, नाईकनगर | एकूण - ५१०९<br>अ.जा. - २९९<br>अ.ज.-८५ | २-अ<br>२- ब<br>२-क | उत्तर - न.प. हद्द (क्रांती ग्रुप जीम ते जलशुध्दीकरण ते सेवालालनगर रोड)<br>पुर्व - सेवालाल नगर रोड ते गणेश नगर रोड<br>दक्षिण - एन.एच.२११ (शिवाजी चौक ते पशुवैद्यकीय दवाखाना)<br>पश्चिम - कोल्हेर रोड (शिवाजी चौक ते न.प. हद्दीपर्यंत | २अ- सर्वसाधारण महिला<br>२ब- सर्वसाधारण महिला<br>२क- सर्व साधारण |
| ३ | गणेश नगर, सरस्वती कॉलनी, सिध्दीविनायक कॉलनी, माउुली नगर | एकूण - ३३५८<br>अ.जा. - ६९८<br>अ.ज.-५८ | ३-अ<br>३- ब | उत्तर - गजानन महाराज मंदीर रोड<br>पुर्व - ताकडगांव रोड कडील न.प. हदद<br>दक्षिण - आखिल सॉ मिल ते साठेनगर बौध्दविहार रस्ता<br>पश्चिम - एन.एच.२११ (पशुवैद्यकीय दवाखाना ते अखिल सॉ मिल जवळील रस्ता) | ३अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>३ब- सर्वसाधारण |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ४ | ६ |
| ४ | भिमनगर, निकम गल्ली, बेद्रे गल्ली, वीर लहुजी नगर | एकूण - ३४९७<br>अ.जा. - ८२७<br>अ.ज.-११ | ४-अ<br>४- ब | उत्तर - आंबेडकर चौक ते कोल्हेर वेस रस्ता<br>पुर्व - एन.एच. २११ (आंबेडकर चौक ते वीर लहूजी नगर टी पॉईट)<br>दक्षिण - वीरलहुजी नगर रस्ता ते निकम गल्ली अंतर्गत रस्ता<br>पश्चिम - कोल्हेर वेस ते मोटेगल्ली, बेद्रेगल्ली मोमीनुपरा मज्जीत ते मझहर मंजिल रस्ता | ४अ- अनुसूचित जाती महिला<br>४ब- सर्वसाधारण |
| ५ | इस्लामपुरा, बाजार गल्ली, मोटे गल्ली, भगवती कॉम्प्लेक्स | एकूण - ३४८६<br>अ.जा. - १६१<br>अ.ज.-२३ | ५-अ<br>५- ब | उत्तर - एन.एच. २११ (शिवाजी चौक ते जमादारणीचा पुल)<br>पुर्व - कोल्हेर वेस ते बेद्रेगल्ली रस्ता<br>दक्षिण - तहसिल रोड, मोटे गल्ली अंतर्गत रस्ता<br>पश्चिम - तहसिल कॉर्नर ते एन.एच. २११जमादारणीचा पुल | ५अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>५ब- सर्वसाधारण महिला |
| ६ | रंगार चौक, बोर्डे गल्ली, पवार गल्ली, राममंदिर गल्ली, धनगर गल्ली, लक्ष्मीनारायण गल्ली | एकूण - ३३५१<br>अ.जा. - ११<br>अ.ज.-०० | ६-अ<br>६- ब | उत्तर - तहसिलरोड, मोटे गल्ली अंतर्गत रस्ता<br>पुर्व - मोमीनपुरा ते मझहर मंजील रस्ता<br>दक्षिण - निकम गल्ली टी पॉईट ते चिंतामणी मंदिर रोड चौक<br>पश्चिम - चिंतामणी मंदीर रोड चौक ते तहसिल कॉर्नर | ६अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>६ब- सर्वसाधारण |
| ७ | सावता नगर, मेन रोड, कोरबुगल्ली, मोंढा भाग | एकूण - ३७१९<br>अ.जा. - १०३<br>अ.ज.-२८ | ७-अ<br>७- ब | उत्तर - एन.एच. २११ जमादारणीचा पुल ते न.प. हद्द<br>पुर्व - चिंतामणी मंदीर चौक ते सावता नगर / इस्लामपुरा समोरील रस्ता<br>दक्षिण - एन.एच. २११ न.प. हद्द ते विद्रुपा नदी न.प.हद्द<br>पश्चिम - विद्रुपा नदी न.प. हद्द | ७अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>७ब- सर्वसाधारण |